# महाराष्ट्र विधानसभा
# दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०१९**
**(सकाळी १०.३० वाजता)**

**एक : तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

**पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** : "गडचिरोली जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये फ्लोराईड युक्त पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत" या विषयावरील श्री.कृष्णा गजबे व इतर वि.स.स. यांच्या दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक १०९२१३ च्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **नगरविकास मंत्री** :

(क) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) मुंबई रेल्वे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **दुग्धविकास मंत्री** : महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उद्योग, उच्च व तंत्र** : (क) मॉयल लिमिटेड यांचा सन २०१७-२०१८ व

**शिक्षण, कृषि व सांस्कृतिक कार्य मंत्री**

२०१८-२०१९ या वर्षाचा अनुक्रमे छप्पनावा व सत्तावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा एकसष्ठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०१२-२०१३ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(च) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(छ) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ज) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी नांदेड यांचे सन २०११-२०१२ ते २०१७-२०१८ या कालावधीचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(झ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २००८-२००९ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ट) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा

लेखा परीक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ठ) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २०१०-२०११ (४२ व ४३) ते २०१५-२०१६ (४४ ते ४७) या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ड) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) वित्त व पणन मंत्री** : (क) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा एकसाष्ठावा वार्षिक लेखा अहवाल व महालेखापाल यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल (S.A.R.) सभागृहासमोर ठेवतील.

**(५) महिला व बाल विकास मंत्री** : (क) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा चोवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : औचित्याचे मुद्दे.**

**चार : सन २०१९-२०२० या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस).**

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

(३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

(४) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.०० वाजता]**

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ — महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१९.

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ — महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०१९.**

---

(२) (क) **सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ — महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ — महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१९ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

सहा : **सर्वश्री सुनिल प्रभू, अजित पवार, विजय वडेट्टीवार, संजय राठोड, दिलीप वळसे-पाटील, अशोक चव्हाण, ॲड आशिष जयस्वाल, सर्वश्री धनंजय मुंडे, पृथ्वीराज चव्हाण, डॉ. संजय रायमुलकर, श्री बाळासाहेब पाटील, ॲड. के.सी. पाडवी, सर्वश्री बच्चू कडू, नवाब मलिक, सुनिल केदार, नितीन देशमुख-टाले, दिलीप बनकर, रणजित कांबळे, राजकुमार पटेल, रोहित पवार, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री संजय गायकवाड, दिपक चव्हाण, राजेश टोपे, अमित झनक, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री अनिल देशमुख, सुभाष धोटे, जितेंद्र आव्हाड, बबनराव शिंदे, कुणाल पाटील, हसन मुश्रीफ, अस्लम शेख, अमिन पटेल, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"विदर्भातील मिहान येथे दीड लाख नोकऱ्या देण्याची योजना असतांना गेल्या पाच वर्षात नोकऱ्या व रोजगारांचे प्रमाण अत्यल्प असणे, विदर्भाच्या महत्वाकांक्षी मिहान प्रकल्पाला चालना देण्यासाठी सर्वोतोपरी गरज, विदर्भातील विदयापीठांमधून दरवर्षी लाखो पदवीधर निर्माण होणे, बेरोजगार युवकांची वाढती संख्या लक्षात घेता मिहानमध्ये रोजगार वाढीसाठी जड उदयोग, कृषी प्रक्रिया उदयोग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरु करण्याची आवश्यकता असणे, विदर्भातील विदयापीठांनी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करुन त्याव्दारे रोजगार निर्मिती करण्याची आवश्यकता असणे, जलयुक्त शिवार योजनेमुळे मोजक्याच शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोचलेले असणे, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष मोठया प्रमाणात असल्याने तो भरुन काढण्याची गरज असणे, विदर्भातील प्रलंबित १३४ सिंचन प्रकल्पांना चालना देण्याची गरज असणे, त्याकरिता राज्य सरकारने विदर्भातील सिंचन प्रकल्पांना अधिकाधिक निधी देऊन निश्चित कालमर्यादेत सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक असणे, जल नियामक प्राधिकरणाने आगामी पाच वर्षात सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी माननीय राज्यपालांना सादर केलेल्या पाच वर्षीय योजनेला गांभीर्यपूर्वक पूर्ण करण्याचे निश्चित धोरण आखण्याची गरज असणे, गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्प सन २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे फेरनिर्धारित करण्याच्या धोरणाचा तातडीने फेरआढावा घेण्याची गरज असणे, गोसेखुर्द प्रकल्प २४ महिन्यात पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारकडून निश्चित धोरण आखण्याची व निधी पुरवठा करण्याची तातडीची गरज असणे, विदर्भातील कापूस, सोयाबीन, तूर, धान, मका इत्यादी उत्पादनावर आधारित कृषी प्रक्रिया प्रकल्प भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, बुलडाणा व अकोला या जिल्हयांमध्ये निर्माण करणे, संत्रा प्रक्रिया प्रकल्पाला नवीन चालना देण्याची गरज असणे, विदर्भातील औष्णिक वीज प्रकल्पांच्या अत्याधुनिकीकरणासाठी राज्य सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज असणे, या प्रकल्पांना नियमित कोळसा पुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, विदर्भासह राज्यातील पर्यावरणाला धोका निर्माण झाला असून मागील सरकारने घोषित ३३ कोटी वृक्षलागवड योजनेत मोठा गैरप्रकार झाला असणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान संस्थानला सन २०१४ मध्ये मंजूरी मिळणे, तथापि, अद्यापही रुग्णालयाचे काम अदयाप सुरु न होणे, अमरावतीत वस्त्रोदयोग पार्कला शासनाकडून प्रोत्साहन मिळण्याची

तेथील उत्पादकांची अपेक्षा असणे, विदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, गोंडवाना विदयापीठ तसेच कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विदयापीठ तसेच महाविदयालयामध्ये मोठया प्रमाणात रिक्त जागा असणे, त्यामुळे उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होणे व त्याचा परिणाम विदर्भातील रोजगार निर्मितीवर होणे, नागपूरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयातले अपग्रेडेशनचे काम रखडणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम जमिनी अभावी रखडणे, मागील ५ वर्षात विदर्भासाठी मोठमोठया घोषणा करण्यात येणे परंतु त्या पुर्ण न होणे, विदर्भात वन्यजीव पर्यटन विकासाकरिता उपलब्ध असणारी विपूल साधनसंपत्ती व संधी यांचा उपयोग करुन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संसाधनासहीत विकास करणे, पर्यटकांना आकर्षित करुन अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा, राज्याच्या आर्थिक क्षमतेत वाढ व्हावी व पर्यटन तसेच सेवा उदयोग वाढावा, राष्ट्रीय वन्यजीव पर्यटन स्थळाप्रमाणे वन्यजीव सर्किट तयार करुन ताडोबा, पेंच, नागझिरा इ.वन पर्यटन स्थळे विकसित करणे, विदर्भातील तिर्थक्षेत्रे व पर्यटन स्थळांचे सर्किट तयार करुन रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील रस्ते विकासाचा अनुशेष लक्षात घेता राज्य महामार्गाचे चौपदरीकरण करण्याची आवश्यकता असणे, नागपूर येथील इंदिरा गांधी वैदयकिय महाविदयालय व इस्पितळाला आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असणे, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी महत्वपूर्ण असलेल्या दुग्धव्यवसाय वाढीसाठी एन.डी.डी.बी च्या सहकार्याने मराठवाडा व विदर्भात पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायाच्या कार्यक्रमाला चालना देऊन शेतकऱ्यांना स्थायी उत्पन्न निर्माण करण्याची आवश्यकता असणे, मिहान मध्ये योगगुरु रामदेव बाबांच्या पतंजली फुडपार्क बंद झाल्याने तेथील कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणे परिणामी हजारो कर्मचाऱ्यांच्या परिवारावर उपासमारीची वेळ येणे, विदर्भातील रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत राहिल्यामुळे होणारे रस्ते अपघात, मेळघाट व्याघ्रप्रकल्पातील गावांचे तसेच पेढी प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे काम गेल्या ५ वर्षापासून रखडणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारित सुतगिरण्या व कापूस उदयोगाला चालना देण्याची गरज असणे, विदर्भाच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता व करावयाची उपाययोजना."

**सात : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, गिरीष महाजन, डॉ. संजय कुटे, ॲड आशिष शेलार, सर्वश्री प्रशांत बंब, बबनराव पाचपुते, संभाजी पाटील निलंगेकर, राजेंद्र पाटणी, रविंद्र चव्हाण, अतुल भातखळकर, ॲड राहुल नार्वेकर, सर्वश्री. राम कदम, मंगलप्रभात लोढा, राधाकृष्ण विखे-पाटील, गणेश नाईक, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री जयकुमार रावल, नितेश राणे, श्रीमती देवयानी फरांदे, श्री. जयकुमार गोरे, ॲड पराग अळवणी, श्री राणाजगजितसिंह पाटील, ॲड राहुल कुल, सर्वश्री संजय सावकारे, सुरेश भोळे, अमित साटम, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री मदन येरावार, राम सातपुते, अभिमन्यू पवार, सुनिल राणे, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री**

**कालिदास कोळंबकर, प्रशांत ठाकूर, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री योगेश सागर, संजय केळकर, विनय कोरे, किसन कथोरे, अतुल सावे, संतोष दानवे, हरिभाऊ बागडे, रवि राणा, श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, सर्वश्री महेश बालदी, नारायण कुचे, प्रकाश आवाडे, प्रा.डॉ. अशोक उईके, किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया, मोहन मते, समीर कुणावार, प्रताप अडसड, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री समीर मेघे, हरिष पिंपळे, रणधीर सावरकर, श्रीमती श्वेता महाले, ॲड आकाश फुंडकर, सर्वश्री गोवर्धन शर्मा, दादाराव केचे, कृष्णा गजबे, संजीवरेड्डी बोदकुरवार, डॉ. तुषार राठोड, कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री लक्ष्मण जगताप, सिध्दार्थ शिरोळे, सर्वश्रीमती मोनिका राजळे, गीता जैन, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा, खान्देश व पश्चिम महाराष्ट्रासह कोकणामध्ये अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होणे, सर्वाधिक प्राणहानी व मोठया प्रमाणात जनावरे मृत्यूमुखी पडल्याची बाब निदर्शनास येणे, द्राक्षबागा, भाजीपाला, फुले, फळे, फळबागा, जनावरांचा चारा इ. पिकांची हानी होऊन सोयाबीन, कापूस, तूर, ज्वारी, बाजरी इ. उत्पादकांचे देखील नुकसान होणे, ९४ लाख हेक्टरपेक्षा अधिक भात शेतीचे नुकसान झाले असणे, शेतकरी अडचणीत असताना कापूस खरेदी केंद्र व तूर खरेदी केंद्र अद्यापही सुरु नसणे, कोकणात झालेल्या 'क्यार' चक्रीवादळामुळे ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयात हजारो हेक्टर क्षेत्रावरील भात पिकांचे व मच्छिमारांचे प्रचंड नुकसान होणे, सिंधुदूर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील आचरा गावातील १२७ शेतकऱ्यांच्या १७.३९ हेक्टरवरील भातपिक क्षेत्राचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, सिंधुदूर्ग जिल्हयातील ०८ तालुक्यांतील ७३,४६२ शेतकऱ्यांचे ३३,२३० हेक्टर, रायगड जिल्ह्यामध्ये ७९,०१३ इतक्या बाधित शेतकऱ्यांचे २६,६२३ हेक्टर, रत्नागिरी जिल्हयामध्ये ५४,१९७ इतक्या बाधित शेतकऱ्यांचे ११,७२४ हेक्टर भातपिकाचे तसेच सिंधुदूर्ग जिल्हयातील आचरा, पिरावाडी व जामडूल गावांतील ९७ मच्छिमारांच्या जाळी, होडी तसेच खारवलेले मासे यांचे एकूण रु. ५६,६७,७७०/- एवढया रक्कमेचे नुकसान झालेले असणे, राज्यातील मच्छिमारांना डिझेलचा परतावा अद्यापही न मिळणे, बाधित शेतकऱ्यांपैकी मोजक्याच शेतकऱ्यांकडे पीक विमा असणे, वचननाम्यात "शेतकऱ्यांचे हित" या शीर्षकाखाली राज्यातील शेतकऱ्यांना सेवा-सवलतीची आश्वासने दिली असताना व शेतकऱ्यांना कोरडवाहू पिकांसाठी एकरी रुपये २५,०००/- व बागायती पिकांसाठी एकरी रुपये ५०,०००/- भरपाई देण्याची सत्तेत येण्यापूर्वी मागणी केलेली असताना शासन स्थापित होऊन २० दिवसांचा कालावधी उलटल्यानंतरही मा. मुख्यमंत्री महोदयांच्या तत्कालीन मागणीची अद्यापही पूर्तता न होणे, शासन सत्तेत आल्यानंतरच्या कालावधीत जनहिताचे नवीन निर्णय करण्याऐवजी मागील शासनाने घेतलेल्या लोकहिताच्या निर्णयांना प्राधान्याने स्थगिती देण्याची शासनाची भूमिका, शेतकऱ्यांना कायमस्वरुपी सिंचनासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड, दमणगंगा-पिंजाळ, नार-पार-तापी नदीजोड प्रकल्प यासारख्या लोकहिताच्या योजनांना गतिमान करण्याची आवश्यकता, राज्यातील सुमारे १९,००० गावांमध्ये सुरु असलेल्या पाणी पुरवठा योजनांची व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता,

आचारसंहितेमुळे खोळंबलेल्या निविदा तातडीने जारी करण्याची आवश्यकता, प्रधानमंत्री सिंचन योजना व बळीराजा जलसंजीवनी योजनांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याची आवश्यकता, पाणी पुरवठा योजनांसह इतरही योजनांवर स्थगितीचे असलेले भय, त्याचे तातडीने निराकरण करुन नागरिकांना भयमुक्त करण्याची गरज, यासह शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गेली ५ वर्षे जे मिळाले ते कायम राहिल याबाबत आश्वस्त करण्यासाठी राज्य शासनातर्फे करावयाच्या उपाययोजना, मा. मुख्यमंत्री महोदयांनी मंत्रीमंडळाच्या पहिल्या बैठकीत शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करुन सात/बारा कोरा करण्याची केलेली घोषणा, तथापि अद्यापही त्यादृष्टीने निर्णय केला नसल्याने शेतकरी हवालदिल झालेला असणे, नागपुरात राज्य विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असताना या नगरीचे प्रथम नागरिक यांच्या वाहनावर गोळीबार होणे, त्याच्या दुसऱ्याच दिवशी विक्रोळीतील शिवसेना उपविभाग प्रमुख यांच्यावर गोळीबार होणे, अशा घटनांनी निर्माण झालेली दहशत, अशा गुन्ह्यांना पायबंद घालण्यात आलेले अपयश, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

**आठ : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१९ चे वि.स.वि. क्रमांक ५० – भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१९ – **श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१९ चे वि.स.वि. क्रमांक ५१ – महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ – **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १९ डिसेंबर, २०१९

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा